# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 05/11/2022 (शनिवार ) दुपार

---

### अपघातात मृत्यु

**पो.स्टे. केळवद** :— अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील मौजा परसोडी शिवार येथे दिनांक ०५/११/२०२२ चे ०९.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— पियुष विजय बांगडे, वय २५ वर्ष, रा. प्लॉट नं. २३७ शिल्पा सोसायटी बेलता रोड, मनिष नगर नागपूर हा आपले मित्र नामे— १) निर्भय संजय चन्ने, २) शुभम सम्राट ठाकरे दोन्ही रा. नागपूर यांचे सोबत स्विफ्ट कार क्र. एम. एच. ४० सी.एच. ०११८ ने जामसावळी येथुन नागपूर येथे जात असता सावनेर ते छिंदवाडा हायवे रोडवर केळवद गावासमोरील परसोडी शिवारात समोरून येणारी आरोपीची बस क्र. एम. एच. ४०/एन—९९९२ च्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन स्विफ्ट कारला जोरदार धडक मारल्याने फिर्यादीचा मित्र तसेच कार चालक मृतक नामे—अभिकेत लिचडे हा जागीच मरण पावला. तसेच फिर्यादी पियुष बांगडे व त्याचे ०२ मित्र १) निर्भय संजय चन्ने २) शुभम सम्राट ठाकरे, दोन्ही रा. नागपूर हे अपघातामध्ये गंभीर जखमी झाले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. केळवद येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३३८, ३०४ (अ), सहकलम १८४ भांदवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन केळवद करीत आहे.

### अपघातात मृत्यु

**पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील सावनेर तहसिल कार्यालय जवळ महाजन लॉन समोर येथे दिनांक ०४/११/२०२२ चे १३/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— संजय गणपतदास हेडाउ, वय ४१ वर्ष रा. वार्ड क्र २ लोधीखेडा ता. सौसर यांचे वडील नामे— वडील गणपतदास जंगल्या हेडाउ, वय ६८ वर्ष, रा. लोधीखेडा, वार्ड क्र २ ता. सौसर जि. छिदवाडा राज्य मध्यप्रदेश हे नमुद वेळी व ठिकाणी रोड क्रॉस करीत असतांना यातील आरोपी नामे—विकास रमेशजी घाटे, वय २२ वर्ष, रा. परसोडी ता. सावनेर याने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल होन्डा शाईन क्र एम. एच ४०/बी.बी —४९३७ ही भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून फिर्यादीचे वडीलांना धडक देवून त्याना गंभीर जखमी करून त्याच्या मरणास कारणीभुत ठरला आहे. तसेच तो स्वत: देखील जखमी झाला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनरे येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३०४ (अ) भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन सावनेर करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर